# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

**दिनांक : ०९/०८/२०२३**

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांच्या व वीर सैनिकांच्या स्मरणार्थ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माझी माती माझा देशहे देशव्यापी आणि लोकाभिमुख अभियान केंद्र सरकारच्या निर्देशानुसार राबविले जात आहे .उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीनेही या राष्ट्रीय अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत.

यामध्ये उल्हासनगर शहरातील खालील जागांवर वसुधा वंदन म्हणून ७५देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करून अमृत वाटिका तयार करण्यात आली आहे. सदर वृक्षांची रोपे शहापूर येथील वन विभागाच्या समन्वयातून उपलब्ध करुन घेण्यात आली आहेत.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | वृक्ष लागवडीचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र. १ | मिडटाऊन , गोलमैदान, उल्हासनगर-१ | सकाळी ११.०० वाजता |
| २ | प्रभाग समिती क्र. २ | सपना गार्डन, चिल्ड्रन पार्क, उल्हासनगर-३ | दुपारी १२.०० वाजता |
| ३ | प्रभाग समिती क्र. ३ | छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर-५ | दुपारी १२.३० वाजता |

वरील ३ अमृतवाटीकांचे उद्‌घाटन दिनांक १०/०८/२०२३ रोजी मा.आमदार महोदय श्री. कुमार आयलानी तसेच मा.आयुक्त श्री. अजिज शेख यांचे हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. उर्वरीत एका अमृतवाटीकेचे उद्‌घाटन स्वातंत्र्य दिनी दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी केले जाणार आहे. तसेच वरील ३ ठिकाणी कलशामध्ये पाणी भरुन "वसुधा वंदन" केले. यावेळी मा. डॉ. करुणा जुईकर , अतिरिक्त आयुक्त (सेवा ) , मा. श्री. जमीर लेंगरेकर , अतिरिक्त आयुक्त (शहर ) , मा.श्री. अशोक नाईकवाडे, उप आयुक्त (मुख्यालय) , मा. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त (पर्यावरण) यांचेसह महापालिकेच्या [illegible] श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी , महापालिका सचिव, श्री. संदीप जाधव , शहर अभियंता , श्री. गणेश शिंपी, सहाय्यक आयुक्त , श्री. जेठानंद ताराचंदानी , सहाय्यक आयुक्त , श्री. अनिल खतुरानी, सहाय्यक आयुक्त , श्री. अंकुश कदम, भांडार विभाग प्रमुख, श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण विभाग प्रमुख, श्रीम. अलका पवार, मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. छाया जावळे, जनसंपर्क अधिकारी, श्री. राजेश घनघाव, श्रीम. दिप्ती पवार, उद्यान अधिक्षक उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.